राज्य उत्पादन शुल्क विभागातील दिव्यांग पद सुनिश्चितीकरिता तज्ञ समिती गठीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : H.D.-५४०३२/४/२०२६-MHD-(EXC-१)-Home Department E-१६३२२६०**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक - ५ ऑक्टोबर, २०२६.

<u>संदर्भ</u>:- १) गृह विभाग शासन निर्णय क्र.एमआयएस-१०२०/प्र.क्र.११७/राउशु-१, दि.२९.०७.२०२१.

२) दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय दिव्यांग-२०२५/प्र.क्र.२६/कार्यासन-१/E-१४५८९५ दि.०३.१२.२०२५.

३) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाचे पत्र क्र.इएसटी-११२०२६/दिव्यांग पदे/०३/२-क, दि.२३.०३.२०२६.

**<u>प्रस्तावना :-</u>**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३४ नुसार सरळसेवा व पदोन्नतीमध्ये दिव्यांगांना चार टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. सदर आरक्षण दिव्यांगांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने विहित केले आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था, महामंडळे इ. मध्ये पदांचा आढावा घेऊन कलम ३३ अन्वये दिव्यांगांची पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे.त्यानुषंगाने संदर्भाधीन क्र.२ च्या शासननिर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३३(२) नुसार दिव्यांगांसाठी पद सुनिश्चिती करण्यासाठी तज्ञ समितीची पुनर्रचना करणे आणि कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.त्यानुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागातील दिव्यांगासाठी पदसुनिश्चिती केलेल्या संवर्गांचा आढ़ावा घेण्याकरिता समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य उत्पादन शुल्क विभागातील दिव्यांगासाठी पदसुनिश्चिती केलेल्या संवर्गांचा आढ़ावा घेण्याकरिता अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,राज्य उत्पादन शुल्क यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे तज्ञ समितीची स्थापना करण्यात येत आहे:-

| **<u>अ.क्र.</u>** | **<u>पदनाम, विभाग</u>** | **<u>पदनाम</u>** |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,राज्य उत्पादन शुल्क मंत्रालय,मुंबई | अध्यक्ष |
| २. | आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई | सदस्य |
| ३. | विभाग प्रमुख, मज्जातंतू चिकित्सा विभाग, सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व KEM रुग्णालय, मुंबई | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४. | विभाग प्रमुख, अस्थिव्यंग चिकित्सा विभाग, सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व KEM रुग्णालय, मुंबई | सदस्य |
| ५. | विभाग प्रमुख, मानसोपचार विभाग, सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व KEM रुग्णालय, मुंबई | सदस्य |
| ६. | उपसचिव,(राउशु), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

२. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल:-

अ) समिती सहाय्यक तंत्रज्ञानातील विकास, तसेच केंद्र शासनाने दिनांक ०४.०१.२०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये दिव्यांगांसाठी सुनिश्चित केलेली पदे आणि दिव्यांग व्यक्तींच्या रोजगारातील जागतिक मानके विचारात घेऊन त्यांच्या आस्थापनांतील विशिष्ट श्रेणीतील दिव्यांगत्वासाठी प्रत्येक/सर्व संवर्गाच्या योग्यतेचा अभ्यास करून विभागातील सर्व संवर्गांसाठी पदसुनिश्चिती करेल व त्याबाबत दिव्यांग कल्याण विभागास प्रस्ताव सादर करेल.

ब) एखाद्या संवर्गासाठी पदसुनिश्चितीमधून सूट द्यावयाची असल्यास समिती त्याबाबतचा प्रस्ताव दिव्यांग कल्याण विभागास समर्पक कारणमीमांसेसह सादर करेल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६१००५१२०५१८३८२९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SURAJ SURESH BELEKAR

Digitally signed by SURAJ SURESH BELEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=B25AB9D6185AFB975695729F0D555181C870F4196C6EA97DBCB98C0BE8D78500, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=430860E347E6D3A9ADC71ABF4F4174EE98650EBC2880 81F6BA760C324A5300E6, cn=SURAJ SURESH BELEKAR
Date: 2026.10.05 12:06:47 +05'30'

**(सुरज बेलेकर)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.उपमुख्यमंत्री,राउशु यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) सचिव,राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई,
३) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४) सर्व समिती सदस्य,
५) उपसचिव, राज्य उत्पादन शुल्क विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७) निवडनस्ती (राउशु-१)